# मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३३ वे राष्ट्रीय अधिवेशनाचा अहवाल

**डॉ. राहुल भगत**
माजी अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद.

ग्रामीण विकास संस्था हिंगणघाट जि. वर्धा येथील रा. सुं. बिडकर कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय हिंगणघाट आणि मराठी समाजशास्त्र परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने १६ आणि १७ फरवरी २०२४ रोजी मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३३ वे राष्ट्रीय अधिवेशन 'समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून आधुनिक भारतीय समाजाच्या निर्मिती प्रक्रियेत महात्मा गांधीजींचे योगदान' या विषयावर आयोजित करण्यात आले होते.

व्यक्ती विकास व जडणघडणीत जसे राष्ट्राचे योगदान असते तद्वतच राष्ट्र निर्मिती व राष्ट्र घडणीमध्ये अनेक व्यक्तीचे, व्यक्तिमत्वाचे विचारांचे व कार्याचे योगदान महत्वपूर्ण भूमिका बजावते. भारताच्या इतिहासात देखील वेगवेगळ्या कालखंडात राष्ट्र उभारणीत विविध व्यक्तीचे योगदान महत्वपूर्ण ठरले आहे. प्राचीन काळापासून आजतागायत भारताची निर्मिती अनेकांच्या विचार व श्रमाचे फलित आहे त्यातीलच एक महत्वपूर्ण व्यक्तिमत्व म्हणून भारतीय राष्ट्रीय आंदोलनाचे नेते, स्वातंत्र्य लढ्याचे प्रमुख व राष्ट्रवादी चळवळीला जनसामान्याची चळवळ बनविणारे लोकनेते महात्मा गांधी हे होय. भारताच्या स्वातंत्र्य संग्रामातील प्रमुख नेते व तत्वज्ञ महात्मा गांधी हे होते. अहिंसात्मक असहकार आंदोलनाने भारताला स्वातंत्र्य मिळवून दिले. शतकानुशतके दडपल्या गेलेल्या भारतीयांना निर्भय बनवून त्यांच्यातील नैतिक शक्ती व आत्मविश्वास जागृत करून ब्रिटीश अधिसत्तेविरुध्द् लढयाकरिता त्यांना कटीबध्द् करणारे राष्ट्राच्या स्वातंत्र्य लढ्याचे नेतृत्व यशस्वीपणे करणारे, केवळ भारतालाच नव्हे तर हिंसाचार, विध्वंस, विनाश, यामुळे भयग्रस्त झालेल्या जगाला सत्य अहिंसा व शांती याचा मौलिक संदेश देऊन मानवी कल्याणाचा मार्ग दाखविणारे महान राजकीय संत म्हणून भारताच्या इतिहासात गांधींचे नाव अजरामर झालेले आहे, महात्मा गांधीचे व्यक्तिमत्व हे बहुआयामी होते, त्यांनी आपल्या आयुष्यातील ५५ वर्षे भारताच्या सेवेत घालवली. सन १९२० ते १९४७ या भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या कालखंडास गांधीयुग या नावाने ओळखले जाते. ब्रिटीश राजवटीत भारताची अस्मिता धुळीस मिळाली होती, तसेच भारताचा स्वाभिमान व चैतन्य हरवले होते. अशा परिस्थितीत गांधींनी भारताचे उज्ज्वल भविष्य घडविण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. आधुनिक भारताच्या उभारणी संदर्भात महात्मा गांधींच्या योगदानाबद्दल विशेषत्वाने चर्चा होते. स्वातंत्र्यपूर्व व वर्तमान भारताच्या जडणघडणीच्या तसेच राष्ट्र उभारणीच्या संदर्भात त्यांनी केलेल्या योगदानाची चर्चा या अधिवेशनाच्या माध्यमातून व्हावी यासाठीच मराठी समाजशास्त्र परिषद आणि रा. सु. बिडकर महाविद्यालय, हिंघनघाट जि. वर्धा यांनी या अधिवेशनाचा विषय 'समाजशास्त्रीय दृष्टीकोनातून आधुनिक भारतीय समाजाच्या निर्मिती प्रक्रियेत महात्मा गांधीजींचे योगदान' या विषयावर सदर अधिवेशन आयोजित केले होते.

अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी म्हणजेच दिनांक १६ फेब्रुवारी २०२४ ला सकाळी ११.०० वाजता या अधिवेशनाचा उदघाटन समारंभ पार पडला. उद्घाटन कार्यक्रमात ग्रामीण विकास संस्था, हिंगणघाट च्या अध्यक्षा प्रा. डॉ. उषाकिरण थुटे उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्ष म्हणून उपस्थित होत्या. उदघाटक म्हणून हिंगणघाट विधानसभा मतदार संघाचे मा. आमदार समीरभाऊ कुणावार उपस्थित होते, अधिवेशनाच्या बिजभाषक म्हणून अखिल भारतीय समाजशास्त्र परिषद, दिल्ली च्या अध्यक्षा प्रा. डॉ. मैत्रयी चौधरी, तर विशेष अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चरित्र व साधने समिती, महाराष्ट्र राज्य चे सदस्य सचिव डॉ. प्रदीप आगलावे, प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच डॉ. बी. एम. राजूरकर, प्राचार्य, रा. सु. बिडकर

महाविद्यालय, हिंगणघाट. डॉ. राहुल भगत, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद. डॉ. अशोक बोरकर, सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद. डॉ. धनंजय सोनटक्के, कोषाध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद. डॉ. आर. डी. निखाडे, समन्वयक, रा. सु. बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट आणि मराठी समाजशास्त्र परिषदेचे सर्व कार्यकारिणी सदस्य व विविध विद्यापीठातून आलेले समाजशास्त्र विषयाचे प्राध्यापक या उद्घाटन समारंभाला उपस्थित होते. अधिवेशनाच्या उद्घाटन समारंभात मराठी समाजशास्त्र परिषदेचा जीवन गौरव पुरस्कार समाजशास्त्र विषयाच्या संदर्भातील विशेष योगदानासाठी डॉ. सुर्यकांत घुगरे यांना पाहुण्यांच्या हस्ते देण्यात आला. तसेच अधिवेशनाच्या निमित्ताने निघणाऱ्या समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचे प्रकाशन या कार्यक्रमात करण्यात आले. समाजशास्त्र संशोधन पत्रिकेच्या कार्यकारी संपादक पदाची जबाबदारी उत्कृष्टपणे सांभाळ्याबद्दल समाजशास्त्र संशोधन पत्रिकेचे कार्यकारी संपादक डॉ. प्रियदर्शन भवरे, जालना यांचा व अखिल भारतीय समाजशास्त्र परिषदेवर निवडून आलेले डॉ. दिलीप खैरनार व डॉ. संजय कोळेकर यांचाहि याप्रसंगी विशेष सत्कार मराठी समाजशास्त्र परिषदेच्यावतीने करण्यात आला.

पहिल्या दिवसाचे दुसरे सत्र म्हणून 'भारतीय आरक्षण धोरणाची वाटचाल आणि वर्तमान' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाचे अध्यक्ष म्हणून डॉ. जगन कराडे, प्राध्यापक, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर हे उपस्थित होते तर वक्ते म्हणून डॉ. शरद निंबाळकर, ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ व माजी कुलगुरू, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला हे होते. या परिसंवादाचे सूत्र संचालन डॉ. माधुरी झाडे, समाजकार्य महाविद्यालय, वर्धा यांनी तर आभार व अहवाल लेखन कार्य डॉ. आनंद आंबेकर, कार्यकारिणी सदस्य, मराठी समाजशास्त्र परिषद यांनी केले.

पहिल्या दिवसाच्या तिसऱ्या सत्रात 'डॉ. ईरावती कर्वे स्मृती व्याख्यान' दुपारी २.०० ते ३.०० या वेळेत आयोजित करण्यात आले होते. या व्याख्यानाचा विषय, 'सी. पर्वतम्मा भारतातील पहिली दलित महिला समाजशास्त्रज्ञ: कार्य आणि कर्तुत्व' असा होता. या कार्यक्रमात अध्यक्ष म्हणून, डॉ. नारायण कांबळे, प्राध्यापक, स्वामी विवेकानंद महाविद्यालय, शिरूर ताजबंद व मुख्य वक्ते म्हणून डॉ. एम. एच. मकवाना, सेवानिवृत्त प्राध्यापक, स्कूल ऑफ सोशल सायन्सेस, गुजरात युनिवर्सिटी, अहमदाबाद हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन डॉ. सुधा खडके, समाजशास्त्र विभाग प्रमुख, बापुजी आणे महिला महाविद्यालय, यवतमाळ यांनी तर आभार व अहवाल लेखन डॉ. अर्जुन जाधव, मराठी समाजशास्त्र परिषद कार्यकारिणी सदस्य यांनी केले. चवथ्या सत्रात 'नव्या शैक्षणिक धोरणाचे उच्च शिक्षणावरील परिणाम' या विषयावर दुपारी ३.३० ते ५.०० या वेळेत परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाचे अध्यक्ष म्हणून, डॉ. दिलीप खैरनार, व्यवस्थापन समिती सदस्य, अ. भा. समाजशास्त्र परिषद, न्यू दिल्ली तर प्रमुख वक्ते म्हणून, श्री. रमेश बिजेकर, समन्वयक, शिक्षण बचाव समन्वय समिती, महाराष्ट्र आणि डॉ. संजय कोळेकर, व्यवस्थापन समिती सदस्य, अ. भा. समाजशास्त्र परिषद, न्यू दिल्ली हे उपस्थित होते. या परिसंवादाचे सूत्र संचालन डॉ. गणेश बहादे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, साईबाबा महाविद्यालय, वडनेर यांनी तर आभार व अहवाल लेखन डॉ. विठ्ठल चव्हाण, कार्यकारिणी सदस्य, मराठी समाजशास्त्र परिषद यांनी केले.

सायंकाळी ५.०० ते ७.०० या वेळेत मराठी समाजशास्त्र परिषदेची आमसभा परिषदेचे अध्यक्ष, डॉ. राहुल भगत यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. या आमसभेला परिषदेचे सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. या आमसभेत दत्ताजी कदम महाविद्यालय, इचलकरंजी येथे संपन्न झालेल्या म. स. प. च्या ३२ व्या अधिवेशनाचा इतिवृतांत वाचून सर्व सदस्यांच्या संमतीने तो कायम करण्यात आला. या आमसभेत परिषदेचे कोषाध्यक्ष डॉ. धनंजय सोनटक्के यांनी आर्थिक वर्ष २०२२-२३ चा अंकेक्षण अहवाल सभेसमोर वाचून दाखविला. या अंकेक्षण अहवालास

परिषदेच्या सर्व सदस्यांनी मंजुरी दिली. तसेच डॉ. धनंजय सोनटक्के यांनी आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये झालेल्या जमाखर्चाचा हिशोब आमसभेसमोर ठेवला, तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

डॉ. राहुल भगत यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारिणीचा कार्यकाल संपत आल्याने मराठी समाजशास्त्र परिषदेच्या नूतन कार्यकारिणीचे गठन करण्यासाठी निवडणूक घेण्याचे ठरले. त्यानुसार, परिषदेचे अध्यक्ष डॉ. राहुल भगत यांनी निवडणूक अधिकारी म्हणून डॉ. दिलीप खैरनार व डॉ. नारायण चौधरी आणि मतदान अधिकारी म्हणून डॉ. राजकुमार भगत व डॉ. किरण सुरवसे यांची नियुक्ती केली. निवडणूक अधिकाऱ्यांनी निवडणुकीचा कार्यक्रम घोषित केला. त्यानुसार अध्यक्षपदासाठी चार अर्ज सुद्धा आले होते. परंतु मराठी समाजशास्त्र परिषदेचे माजी अध्यक्ष डॉ. नारायण कांबळे व विद्यमान अध्यक्ष डॉ. राहुल भगत, डॉ. संजय साळुंखे, डॉ. कालिदास भांगे यांच्या विशेष प्रयत्नामुळे ही निवडणूक बिनविरोध करण्यात आली आणि संपूर्ण सदस्यांच्यावतीने आमसभेत अध्यक्षांच्या निवडीची घोषणा करण्यात आली. आमसभेत निर्विरोधपणे डॉ. लक्ष्मनसिंह साळोख यांच्या अध्यक्षतेखाली नूतन कार्यकारिणीचे गठन करण्यात आले. सत्र २०२४ ते २०२६ साठी पुढील कार्यकारिणी निवडण्यात आली.

**अध्यक्ष:** डॉ. लक्ष्मणसिंह साळोख, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

**सचिव:** डॉ. कालिदास भांगे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, छत्रपती संभाजीनगर.

**कोषाध्यक्ष:** डॉ. प्रियदर्शन भवरे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर.

**कार्यकारिणी सदस्य:**

डॉ. राजू बुरीले, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर.

डॉ. अनिल वानखेडे, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती,

डॉ. पंढरी वाघ, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

डॉ. वाल्मिक इंदासे, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे,

डॉ. प्रशांत नारगुडे, मुंबई विद्यापीठ, मुंबई.

डॉ. प्रवीण घोडेस्वार, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

डॉ. नानासाहेब पाटील, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

डॉ. सतीश देसाई, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर,

डॉ. चंद्रकांत कांबळे, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर विद्यापीठ, सोलापूर.

डॉ. प्रशांत सोनवणे, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव,

डॉ. प्रकाश काळवणे, एस. एन. डी. टी. विद्यापीठ, मुंबई,

डॉ. दिगंबर तंगलवाड, महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठ, वर्धा

डॉ. जयमाला लाडे, (महिला प्रतिनिधी), संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

यांच्या नावाची घोषणा करण्यात आली. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी म्हणजे दिनांक १७ फेब्रुवारी २०२४ ला सकाळी ९.०० ते ११.३० या वेळात, अधिवेशनाच्या पाचव्या सत्रात विविध संशोधन समित्यांच्या माध्यमातून 'शोध निबंध सादरीकरण' करण्यात आले. या सत्रात शोध निबंधाचे वाचन मराठी समाजशास्त्र परिषदेच्या १० संशोधन समितीनुसार १० वेगवेगळ्या कक्षात करण्यात आले. अधिवेशनाच्या सहाव्या सत्रात 'विदर्भातील शेतकऱ्यांचे प्रश्न व ग्रामीण मागासलेपण' या विषयावर परिसंवाद आयोजित करण्यात आला होता. या परिसंवादाचे अध्यक्ष म्हणून डॉ. मनोहर बुटे, सेवानिवृत्त प्राचार्य, संताजी महाविद्यालय, नागपूर व प्रमुख वक्ते म्हणून श्री. विजय जावंधिया, वरिष्ठ शेतकरी नेते आणि डॉ. श्रीनिवास खांदेवाले, अर्थशास्त्रज्ञ, माजी प्राध्यापक, रा. तु. म. नागपूर विद्यापीठ, नागपूर हे उपस्थित होते. या परिसंवादाचे सूत्र संचालन डॉ. मेघशाम ढाकरे, समाजशास्त्र विभाग प्रमुख, विद्या विकास महाविद्यालय, समुद्रपूर यांनी तर आभार व अहवाल लेखन डॉ. नलिनी बोरकर, कला व वाणिज्य पदवी महाविद्यालय, पेट्रोलपंप, जवाहरनगर जि. भंडारा

यांनी केले. अधिवेशनाचे सातवे सत्र, 'पुरस्कार वितरण आणि समारोप समारंभ' चे होते. या समारोपीय कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून डॉ. नारायण चौधरी, सेवानिवृत्त प्राध्यापक, य. च. म. मु. विद्यापीठ, नाशिक व विशेष अतिथी म्हणून डॉ. बी. एम. राजूरकर, प्राचार्य, रा. सु. बिडकर महाविद्यालय, हिंगणघाट, डॉ. राहुल भगत, अध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद, डॉ. अशोक बोरकर, सचिव, मराठी समाजशास्त्र परिषद, डॉ. धनंजय सोनटक्के, कोषाध्यक्ष, मराठी समाजशास्त्र परिषद व परिषदेचे सर्व कार्यकारिणी सदस्य उपस्थित होते. समारोपीय कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा. प्रमोद वानखेडे, सहसमन्वयक, म. स. प. ३३ वे अधीवेशन यांनी तर पुरस्कार वितरण कार्यक्रमाचे संचालन डॉ. हरिदास पेटकर, कार्यकारिणी सदस्य, मराठी समाजशास्त्र परिषद, तसेच आभार डॉ. आर. डी. निखाडे, समन्वयक, मराठी समाजशास्त्र परिषदेचे ३३ वे अधिवेशन, यांनी मानले.

समारोपीय कार्यक्रमात मराठी समाजशास्त्र परिषदेतर्फे दिल्या जाणाऱ्या विविध पुरस्काराचे वितरण प्रमुख अतिथींच्या हस्ते करण्यात आले. त्यात पुढील पुरस्काराचा समावेश होता. मराठी समाजशास्त्र परिषदेच्या वतीने सौ. प्रतिमा कुलकर्णी 'उत्कृष्ट महिला प्राध्यापक पुरस्कार' डॉ. प्रतिभा अहिरे, शिवाजी महाविद्यालय, कन्नड यांना देण्यात आला. डॉ. प्रदीप आगलावे उत्कृष्ट प्राध्यापक / संशोधक पुरस्कार' डॉ. मोहन नगराळे, धरमपेठ महाविद्यालय, नागपूर यांना देण्यात आला. 'जय जोशी संदर्भ ग्रंथ / क्रमिक ग्रंथ पुरस्कार' डॉ. महेंद्र जाधव, कोल्हापूर व डॉ. विनोद खेडकर, नागपूर यांना विभागून देण्यात आला. 'डॉ. अनुराधा भोईटे उत्कृष्ट प्रकाशित लेख पुरस्कार' डॉ. शिल्पा जाधव, मुंबई यांना देण्यात आला. 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार (प्राध्यापकांसाठी) डॉ. शिवाजी उकरंडे, रत्नागिरी यांना व डॉ. जी. एस. घुर्ये उत्कृष्ट शोध निबंध पुरस्कार (विध्यार्थ्यांसाठी) डॉ. राजेंद्र बगाटे, छत्रपती संभाजी नगर यांना देण्यात आला. तसेच याप्रसंगी मराठी समाजशास्त्र परिषदेच्या कार्यकारिणीवर कार्य केलेल्या सर्व कार्यकारिणी सदस्यांना व संशोधन समितीच्या सर्व समन्वयकांना विशेष प्रमाणपत्र देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.